नोंदणी व चहापान झाल्यावर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सभासद दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात गेले. या सभागृहात मागच्या बाजूला स्टॉलधारकांसाठी वेगळी व्यवस्था होती. हँडबॅग्ज, पर्सेस, आंबा, कोकणमेवा, घरगुती उत्पादने, विविध साबण, उदबत्या, परफ्यूम्स, केक-बिस्किटे अशा विविध उत्पादनांचे स्टॉल्स सर्वांचे लक्ष्य वेधून घेत होते. काहींनी तर खरेदीलाही सुरुवात केली होती.

बरोबर साडेपाच वाजता केशवराज पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. मंडळाच्या कार्यवाह सरिता देवधर यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची सूत्रे शुभांगी सुनिल देवधर (नाशिक) यांचेकडे सुपूर्त केली. त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची थोडक्यात रूपरेषा सांगितली.

सन २०२२ हे स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी

वर्ष असल्याने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'जयोस्तुते .....' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सौ.. मंजिरी समीर, व सौ. वृषाली विष्णू (डोंबिवली) आणि स्वत: शुभांगी सुनिल या तिघींनी हे गीत सादर केले. त्यानंतर शुभा देवधर यांनी सहकलाकारासह 'अच्युतम् केशवम्' हे भजन सादर केले. आपले ज्येष्ठ कुलबंधू श्री. कांत देवधर (नाशिक) यांनी माऊथ ऑर्गनवर काही हिंदी गाणी उत्तमरित्या सादर केली. दुसरे ज्येष्ठ सभासद श्री. वा. ना. देवधर (जोगेश्वरी) यांनीही शहाऐंशीव्या वर्षी एक भजन व दोन भावगीते सादर केली. या दोन्ही ज्येष्ठांकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. छोट्या मुक्ता देवधर हिने अजिबात न घाबरता एक बालगीत अगदी मोकळेपणानी सादर केले.

यानंतर जनरल नॉलेज क्विज ची पहिली फेरी झाली. डॉ. सौ. सुगंधा देवधर यांनी स्पर्धकांना विविध प्रश्न विचारले. उत्तर बरोबर देणाऱ्या स्पर्धकांचे छोटेसे बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले.

पुण्याच्याच भावगंधा देवधर यांनी स्वरचित कविता सादर केल्या. मंजिरी आणि मानसी यांनी एक चित्रपटगीत. अत्यंत सुरेल आवाजात सादर केले. त्यानंतर त्यांनी एक ठसकेबाज लावणी सादर केली. सावनी व वरदा या बालकलाकारांनी गाणं म्हणून आपला ठसा उमटवला. सौ. मंजिरी, सुमित, केदार, समीर या कुलबंधू-भगिनींनी चित्रपटगीतं सादर केली. गोपाळ नारायण यांनी 'कानडा राजा पंढरीचा' हा अभंग अतिशय भक्तिभावाने सादर केला. श्री. काशिनाथ देवधर आणि रवींद्र देवधर यांनी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्ताने केलेल्या संकल्पाबद्दल माहिती सांगितली. विलेपार्ले येथील अपर्णा चंद्रशेखर यांच्या सतार वादनाने कार्यक्रमाची रंगत वाढली.

यानंतर पुन्हा एक छोटेसे क्विझ घेण्यात आले. त्यामुळे कार्यक्रम कुठेही कंटाळवाणा न होता उत्तरोत्तर रंगतच गेला. 'सूरमयी शाम' असेच या संध्याकाळचे वर्णन करावे लागेल. नाशिकच्या शुभांगी सुनिल देवधर यांचे खुमासदार सूत्रसंचलन सगळ्यांची वाहवा मिळवून गेले. त्यानंतर कढी, खिचडी, पावभाजी, मिरगुंडे अशा भोजनानंतर 'उद्या भेटू या' असे म्हणून सर्वांनी निरोप घेतला. हॉलवर राहणाऱ्या मंडळींची व्यवस्था मंजिरी (सांगली) व सुनिल आणि सौ. गीतांजली (पुणे) यांनी उत्तम केली होती.

रविवार १५ मे हा दिवस वेगळाच उत्साह घेऊन उजाडला होता. साधारण नऊ वाजेपर्यंत सर्वजण सभागृहात जमा झाले. अंतिम उपस्थिती १८१ होती. त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह अधिकच वाढला होता. आलेल्या प्रत्येकाची नोंदणी झाल्यावर नाष्टा, जेवणाची कूपन्स देण्यात आली. अत्तर लावून लोकांना सुगंधिक केलं गेलं.

नाष्टा करून सर्वजण वर पोहोचले. अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांनी कार्यक्रम सुरू करण्याची सूचना केली. कार्यवाह सरिता देवधर यांनी श्री केशवराजाचे स्मरण करून व्यासपीठावरील मान्यवरांचे, पुरस्कारप्राप्त सत्कारमूर्तींचे, हितचिंतक, देणगीदार, जाहिरातदार आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन आणि केशवराज पूजन झाले. त्या वेळी

सौ. स्वाती देवधर (ठाणे) यांनी गणेशस्तवन म्हटले आणि केशवराजाला प्रार्थना केली. कार्यवाह सरिता देवधर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. हे स्नेहसंमेलन, आनंदमेळावा घेण्यामागची भूमिका काय आहे ते विशद केले. ''कोरोनाच्या काळातील अंधारीचे जीणे आता फिटले आहे, सगळीकडे पुन्हा एकदा आनंद पसरू लागला आहे. तो आनंद एकमेकांना वाटण्यासाठी, हितगुज करण्यासाठी आपण एकत्र आलो आहोत. आपली एक Extended Family तयार झाली आहे. आणि त्या Family सह आजचा आनंद सोहळा आपण साजरा करीत आहोत.'' असे त्यांनी नमूद केले.

त्यानंतर देवधर, दीक्षित व ढमढेरे कुलातील दिवंगत झालेल्या सर्व ज्ञात आणि अज्ञात कुलबंधु-भगिनी, माहेरवाशिणी यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

या नंतर सत्कार समारंभास सुरुवात झाली. वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली आहे, अशा नऊ व्यक्तिंचा सत्कार करण्यात आला. त्याला गुलाबपुष्प, श्रीफळ, शुभेच्छा पत्र आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. शुभेच्छा पत्रांचे लेखन केले आहे कार्यवाह सरिता देवधर यांनी तर वाचन केले सौ. सुगंधा देवधर यांनी.

त्यानंतर ज्यांच्या विवाहास पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा तीन दांपत्यांचे सत्कार गुलाबपुष्प, श्रीफळ, शुभेच्छा पत्र आणि रोख रक्कम देऊन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आले. याही शुभेच्छा पत्रांचे लेखन सरिता देवधर यांनी तर वाचन सौ. सुगंधा देवधर यांनी केले. यानंतर कौतुकास्पद यश मिळविणाऱ्या तरुणाईचा सत्कार करण्यात आला. उज्ज्वल यश प्राप्त करणाऱ्या आठ गुणवंतांचा गुलाबपुष्प आणि रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. कु. चिराग हेमंत देवधर (पनवेल) याने 'सुख म्हणजे नक्की काय असतं?' हे गीत सादर केले.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आतिथी डॉ. दिलिप देवधर (पुणे) हे सपत्निक सभागृहात आले. कार्यवाहांनी त्यांचे व त्यांच्या सौभाग्यवती डॉ. अपर्णा देवधर यांचे स्वागत केले. शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सौ. सुगंधा देवधर यांच्या हस्ते डॉ. अपर्णा यांची साडीने ओटी भरून सन्मान करण्यात आला.

प्रमुख आतिथी डॉ. दिलिप देवधर यांच्या हस्ते व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत ''युवा प्रेरणा' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. स्मरणिकेचे संपादन करीत असताना आलेले अनुभव मंडळाचे उपाध्यक्ष आणि संपादक श्री. पु. गो. देवधर यांनी आपल्या मनोगतात कथन केले. हे काम करताना आपण एक वेगळा आनंद अनुभवला असेही त्यांनी नमूद केले. सर्व लेखक युवक/युवतींचे मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होतं, विविध क्षेत्रांत विशेष कर्तृत्व दाखविलेल्या, आपल्या कार्याने स्वत:चा वेगळा ठसा उमटविणाऱ्या, कौतुकास्पद काम केलेल्या व्यक्तिंचे सत्कार. देवधर मंडळाचा जीवन गौरव पुरस्कार - देवधर मंडळाचे काम नि:स्वार्थीपणे करणाऱ्या डोंबिवलीच्या श्री. नरेश दीक्षित यांना प्रमुख पाहुणे डॉ. दिलिप देवधर यांच्या हस्ते मंडळाचा

जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.

कै. वि. शं. देवधर स्मृति गौरव पुरस्कार - उल्लेखनीय सामाजिक कार्यासाठी दिला जाणारा कै. वि. शं. देवधर स्मृति गौरव पुरस्कार सौ. आदिती देवधर (पुणे) यांना देण्यात आला.

कै. कमलाबाई केशव देवधर स्मृति गौरव पुरस्कार - शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी दिला जाणारा हा पुरस्कार पुण्याच्या देवधर क्लासचे संस्थापक-संचालक श्री. संदीप देवधर यांना प्रदान करण्यात आला.

सौ. नलिनी मनोहर देवधर पुरस्कार - समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत राहून आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तिला दिला जाणारा हा पुरस्कार वाडा-पडेल, सिंधूदूर्ग येथील अनुराधा दीक्षित यांना देण्यात आला.

शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे सत्कारांचे स्वरूप होते. सौ. मंजिरी व सौ. वृषाली (डोंबिवली) यांनी सत्कारमूर्तींना दिलेल्या मानपत्राचे वाचन केले. या मानपत्रांचे लेखन केले आहे आपल्याच एक माहेरवाशिण वसुंधरा पर्वते (पूर्वीच्या सुलभा देवधर) यांनी. पुरस्कार द्यायला सुरुवात केल्यापासून मानपत्र लिहिण्याचे काम सातत्याने त्याच करीत आहेत. यंदा तर त्या अमेरिकेत असूनही त्यांनी हे काम अगदी वेळेत करून दिले. पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपले विचार थोडक्यात मांडले.

त्यानंतर संमेलनाचे अध्यक्ष डॉ. दिलिप देवधर यांनी आपले विचार मांडले. कोरोनाकाळात केलेल्या कामाबद्दल आणि आपल्या इतर सामाजिक कार्याबद्दल त्यांनी थोडक्यात माहिती दिली. पुण्याजवळील भूगाव येथे त्यांनी सुरू केलेल्या सहजीवन या वृद्धाश्रमास सर्वांनी जरूर भेट द्यावी असे त्यांनी आवाहन केले. तसेच शक्य असल्यास मंडळाचे एखादे संमेलन भूगावच्या आश्रमात घ्यावे असे आमंत्रणही त्यांनी दिले.

आजचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे चित्रपट व दूरदर्शनच्या विविध मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटविणारी आजची आघाडीची अभिनेत्री सायली देवधर. सध्या स्टार प्रवाह या वाहिनीवर सुरू असलेल्या लग्नाची बेडी या मालिकेतील सिंधूच्या भूमिकेत ही रोजच भेटत असते. तिनेही आपले मनोगत व्यक्त केले. माहेरच्या माणसात आल्याने विशेष आनंद झाल्याचे तिने सांगितले. पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन अध्यक्षांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. या वेळेची 'लकी ड्रॉ' सोडत तिच्याच हस्ते काढण्यात आली.

दरवर्षी स्मरणिकेच्या मुखपृष्ठासाठी चारोळी लिहिणाऱ्या सौ. पुष्पा नरेश दीक्षित (डोंबिवली) यांचा सत्कार करण्यात आला.

हे संमेलन यशस्वी करण्यासाठी महेंद्र सदाशिव व मंजिरी महेंद्र, नितीन मधुसूदन व मीनाक्षी नितीन, सुनिल व गीतांजली, प्रशांत व कु. वैदेही, केतना ढमढेरे-बर्वे, मुक्ता देवधर, मंजिरी समीर, वृषाली विष्णू, डॉ. दीप व अपर्णा दीप अशा अनेकांचे सत्कार करण्यात आले. यानंतर अध्यक्षांनी आपले मनोगत मांडले. कार्यकारिणी सदस्य श्री. नारायण गोविंद (दिलिप) यांनी आभार प्रदर्शन केले.

आमरस पुरीच्या सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. ***

# भारतीय मुलुखमैदान तोफ

**श्री. काशिनाथ देवधर**, पुणे
९८८१२५३४२५



आयुध अनुसंधान तथा विकास संस्थापन ARDE या DRDO च्या पुण्यातील संस्थेने स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करून ATAGS ही तोफ भारतीय सैन्यदलांच्या विशिष्ट गरजाप्रमाणे बनविली आहे. भारत देशाच्या सीमा सुरक्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या युद्धभूमीवर उत्तम रितीने कार्य करू शकेल अशी अद्ययावत व अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ही तोफ निश्चितच सशस्त्र सैन्यदलांची क्षमता मजबूत करणारी आहे. जगातील सर्व तोफांमध्ये सर्वात लांबचा पल्ला असणारे लक्ष्य गाठून ४८ किमीपेक्षा जास्त प्रत्यक्ष फायर करून प्रदर्शित केली आहे. ATAGS ही तोफप्रणाली १५५ मिमी व्यास म्हणजेच कॅलिबर असणारी तोफनळीची लांबी ५२ कॅलिबर म्हणजेच कॅलिबरच्या ५२ पट आहे. म्हणजेच ८०६० मिमी लांब. याच्या उत्पादनासाठी भारत फोर्ज लिमिटेड, टाटा पॉवर या खाजगी उद्योगांना 'विकास तथा उत्पादन भागीदार म्हणून निवडले आहे. अर्थात तोफगोळे निर्मितीसाठी OFB आयुध निर्माणी यांच्याकडे ही जबाबदारी दिली आहे. भारतीय सेनेच्या तातडीच्या गरजांची निकड लक्ष्यात घेता ऑगस्ट २०१८ मध्ये संरक्षण अधिग्रहण परिषद ने १५० तोफा खरेदी करण्यासाठी रु. ३३६५.७८ कोटी रुपयांची मान्यता दिली.

ATAGS ही अत्यंत प्रभावी तोफ असून सर्व प्रकारच्या अद्ययावत व अत्याधुनिक प्रणालींचा उपयोग व संशोधन करून विकसित केली आहे. त्याच्या अचूक, वारंवार, विश्वसनीय व अतुल्य मार क्षमतेबरोबरच अधिक गतिमानता, प्रगत संवाद प्रणाली, पर्यायी तथा स्वतंत्र अतिरिक्त शक्तिकेंद्र, रात्रदुर्बिण व्यवस्थापन, त्वरित क्रियान्वयन व समापन स्वयंचलित निर्णयक्षम नियंत्रण संगणकीय प्रणाली यांचा उपयोग करून अचूकतेचा व ४८.०७४ किमी पल्ल्याचा उच्चांक स्थापन केला व उच्चांक मोडून नवीन कीर्तिमान प्रस्थापित केला आहे. या तोफेसाठी All Electic Servo Drivers चा उपयोग करून युद्धभूमीवर येणारा देखभाग व दुरुस्तीचा काळ कमी करून उपयोगी कालावधी वाढविला आहे. या पूर्वी बहुदा हायड्रॉलिक सर्व्हो ड्राइव्हचा उपयोग करत. त्या वेळी तेल गळती, हवामानाचे टोकाचे तापमान, धूळ व बारीक वाळूचा परिणाम होत असे. सर्व विद्युतीकरण केल्यामुळे इलेक्ट्रॉनिक्सचा उपयोग करून नियंत्रक सबळ झाले आहेत. व त्यात सोपेपणा व सुटसुटीतपणा जाणवतो. तोफखान्यांकडे असणारी 'शक्तिप्रणाली' (Artillery combat command and control system - ACCCS)

याच्याशी ATAGS तोफा मिळत्याजुळत्या असून तोफखान्याच्या आदेशाप्रमाणे युद्धक्षेत्रात कार्य करतात. उपलब्ध शस्त्रास्त्रांचा साकल्याने विचार करून योग्य व प्रभावी उपयोग करता युद्धभूमी व्यवस्थापन नियोजन क्रियान्वयन आणि आपूर्ती रचना करता येते.

ATAGS ही १५५.५२ कॅल प्रकारातील तोफ मारा करण्याची क्षमता अभूतपूर्व आहे. केवळ पंधरा सेकंदात तीन चा बर्स्ट, १५ तोफगोळे केवळ तीन मिनिटांमध्ये फायर करणे आणि साठ तोफगोळे एका तासात डागता येणे हे अजून एक वैशिष्ट्यं. अठरा ते वीस टन वजनाची ही तोफ सहा ते आठ जवान चालवू शकतात. व शत्रूलक्ष्यावर तोफगोळ्यांचा भडीमार करून ते नष्ट करू शकतात. परिणामकारक कमाल पल्ला साधारण अठरा किमी. चा मिळतो. त्यासाठी High Explosive Base Bleed - HEBB प्रकारचे तोफगोळे विकसित केले आहेत. एकाच तोफेतून डागण्यात आलेले पाच तोफगोळे एकाच वेळी शत्रूलक्ष्यावर मारा करतील असा वेध घेण्याची यंत्रणा, क्षमता ATAGS तोफेची आहे. Thernal sight चा उपयोग करून आणि Automatic Cammand and Cantrol system द्वारा रात्री फायर करण्याचीही क्षमता या तोफेत विकसित केली आहे.

२०१३ मध्ये या तोफप्रकल्पाला विकसित करण्यास सुरुवात झाली व प्राथमिक प्रात्यक्षिक चाचण्या तसेच प्रुफ २०१६ मध्ये झाले. तोफेच्या यशस्वी प्राथमिक डेमो चाचण्यांनंतर २०१७ च्या प्रजासत्ताक दिन संचलनात या तोफा पहिल्यांदा जगासमोर जाहीरपणे संमीलित करून एका अर्थाने घोषणाच केली. सप्टेंबर २०१७ मध्ये तत्कालीन नूतन रक्षा मंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांना तोफेची सलामीच फायरिंग डेमो देऊन एकप्रकारे भरभक्कम संरक्षण तंत्रज्ञानामधील प्रगती दाखवून देशाला आश्वस्त केले. याचा 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमाला बळकटी मिळण्यासाठी उपयोग झाला.

भारतीय सशस्त्र दले जगातील प्रगत सैन्यांमध्ये व्यावसायिकदृष्ट्या आघाडीवर आहेतच. याला स्वदेशी तंत्रज्ञानाची जोड देऊन शस्त्रास्त्रे व दारूगोळा तसेच क्षेपणास्त्रे ही भारतीय तंत्रज्ञानाधारित व भारतातच उत्पादन केली तर कमी खर्चामध्ये भारत स्वयंपूर्ण व मजबूत देश म्हणून उभा राहील आणि रक्षातंत्रज्ञानात अग्रेसर झाला तर परावलंबित्व कमी होईल. याचे सहज परिणाम म्हणून भारत देश झपाट्याने स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करीत आहे. डॉ. अब्दुल कलाम यांच्या अपेक्षेनुसार लवकरच स्वयंपूर्णतेकडे वाटचाल चालू आहे.

लढाईसाठी विविध प्रकारच्या शस्त्रास्त्रांची सैन्याला गरज असते. अगदी छोट्या पिस्तुल, रायफल पासून आंतरखंडीय क्षेपणास्त्रांपर्यंत तसेच सर्वबाजूंनी येण्याऱ्या शत्रूचा मूँहतोड मुकाबला करण्यासाठी विविध तोफखाने, अग्निबाण, विमान विरोधी क्षेपणास्त्रे, सुदूर समुद्रात, खोल समुद्रात, हवेमध्ये व अवकाशामध्ये हल्ला करण्याची किंवा परतवून लावण्याची वेळ आली तर जशी लढाऊ विमाने, लढाऊ जहाजे, पाणबुड्या या सर्वांची आवश्यकता असली, तरी मुलूखमैदानी तोफांचे महत्त्वही खूपच आहे. त्याची आवश्यकता ATAGS तोफखाने निश्चितच भरून काढतील. १९८५ पासूनच्या BOFORS तोफा आता कालबाह्य होऊ लागल्या

आहेत आणि त्याची जागा ATAGS तोफा निश्चितच घेतील अशी खात्री ARDE तील एक शास्त्रज्ञ म्हणून निश्चितच आहे. जशी अग्निबाण तोफखान्यांसाठी पिनाक क्षेपणास्त्र प्रणाली ARDE ने दिली, तशीच ATAGS ही दुसरी अत्यंत महत्त्वाची व प्रतिष्ठेची तोफ सशस्त्र दलांसाठी तयार करून देणे यासारखी आनंदाची गोष्ट नाही.

ATAGS तोफ ही न्यूटनच्या दुसऱ्या नियमावर आधारित, तर पिनाक क्षेपणास्त्र प्रणाली ही न्यूटनच्या तिसऱ्या नियमानुसार कार्य करते. तोफ याला मुलूखमैदानी तोफ म्हणतात. कारण ही केवळ मैदानांमध्येच नाही तर डोंगरी भागात सुद्धा तितक्याच प्रभावीपणे व क्षमतेने सेवा देते. आवश्यकतेनुसार ३° ते ७०° उन्नतांश तर ०/-२५° म्हणजेच डावीकडे व उजवीकडे २५° इतक्या वर्तुळपाकळी क्षेत्रातील ४८ किमी कमाल पल्ल्यावरील शत्रूलक्ष्य अचूक टिपून नष्ट, उध्वस्त करणे हे ATAGS चे अजून एक वैशिष्ट्यं.

ATAGS तोफेचे मुख्य भाग व यंत्रणा या भारतीय स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करून बनविल्या आहेत. तोफेसाठी फायर करताना स्थैर्य प्रदान करणारी तोफगाडी VRDE ने विकसित केली आहे. तर तोफगोळ्यांसाठी लागणारी स्फोटके / नोदक प्रणाली ही च्या साहाय्याने बनविली आहे.तोफगाडीस दोन प्रकारांनी गतिमानता मिळते. तोफ जवळच्या हालचालींसाठी स्वत:चे शक्तिकेंद्र, ज्याची क्षमता १०० कि. वॅट आहे ते वापरून स्वयंचलित पद्धतीने करतात. तोफखाना अथवा तोफा मोठ्या प्रमाणावर आणि जास्त अंतरावर नेण्यासाठी वाहनाच्या मागे बांधून ओढून न्यायची व्यवस्था असते. म्हणूनच या तोफप्रकाराला TOWED GUN म्हणतात. अशा वेळी तोफा वाहून नेतानाचा वेग ताशी चाळीस किमी असतो.

१५५ मिमी व्यासाच्या अतिविस्फोटक तोफगोळ्यांचा पल्ला वाढविण्यासाठी दोन प्रकार केले आहेत. व म्हणजे तोफगोळ्याच्या पुढील बाजूस फ्यूज असतो. व मागील बाजूस त्याचा आकार थोडा निमुळता करतात. त्यामुळे हवेतून जाताना मागील बाजूकडून त्याला होणारा विरोध कमी होतो. पर्यायाने पल्ला थोडा वाढतो. मध्ये चे तंत्रज्ञान विकसित केले आहे. तोफगोळ्याच्या मागील खोबणीमध्ये विशिष्ट नोदक भरून ठेवतात. तोफेतून तोफगोळा डागल्यावर हवेतून लक्ष्यापर्यंत मार्गाक्रमण करीत असताना पाठीकडील गोळ्याच्या खोबणीतील नोदक जळायला सुरुवात होते आणि तप्तवायू बाहेर सोडला जातो. यामुळे तोफगोळा मागून खेचणे बंद होते व पल्ला वाढतो. याच तोफगोळ्याने ४८.०७४ किमी पल्ला देऊन जागतिक कीर्तिमान स्थापन केला आहे.

तोफेसाठी तोफगोळे भरणे हे जिकिरीचे काम असते कारण मोठ्या तोफांचे तोफगोळे ही मोठे व वजनाने जास्त असल्याने ते फायरिंगसाठी भरणा करताना जवानांची दमछाक होऊ नये म्हणून व त्वरित फायर करता यावे यासाठी तोफगोळे तोफेमध्ये भरणारी क्रेन विकसित केली आहे.

तोफेचा सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे तोफ नळी (Gun Barrel). ही उच्चप्रतीच्या पोलादाच्या मिश्रधातूपासून बनवितात. त्यामुळे यांत्रिक गुणधर्माबरोबरच भौतिक व रासायनिक

गुणधर्मही सुधारले जातात. तोफेची झीज कमी होते, ती गंजविरोधी बनते. तोफ डागल्यानंतर निर्माण होणारे स्फोटवायू, उच्च तपमान व उच्चदाब यापासून टिकाव धरणे शक्य होते. अशा पद्धतीत असंख्य वेळा तोफगोळे जलदगतीने फायर केले तरी तोफनळी दणकट राहील अशीच बनवितात. तोफनळी कमी वजनाची तरीही क्षमतावाढ असलेली, न तुटणारी, न पिचकणारी बनते. तोफनळीचे आयुष्य वाढते. तोफनळीत आतून चक्राकार खाचांचा संच असतो, तो कोरून काढावा लागतो. यालाच रायफलिंग म्हणतात. यामुळे तोफगोळा बाहेर फेकताना प्रचंड गतीने स्वत:भोरती फिरत जातो त्यामुळे त्याला अपेक्षित हवाई मार्गावर प्रवास करताना स्थैर्य मिळते.

तोफनळीच्या ज्या बाजूने तोफगोळा भरला जातो तिथे तोफगोळा फायर करायच्या आधी संपूर्ण व मजबुतीने बंद करावे लागते. कारण जेवढे बल/दाब तोफनळीवर कार्य करतो, तेवढेच बल/दाब मागील किंवा सर्व बाजूंवर कार्य करीत असते. तोफगोळा सोडल्यास सर्व बाजू ते सहन करतील एवढ्या मजबूत प्रकाराने बनवाव्या लागतात.

तोफनळीच्या ज्या बाजूकडून तोफगोळा फेकला जातो त्याला 'मझल' म्हणतात. तोफगोळा जेव्हा खूप वेगाने बाहेर पडतो, तेवढाच संवेग तोफेवर कार्य करतो आणि तोफ मागच्या दिशेला ढकलली जाते. त्याला प्रतिक्रियाबल असे म्हणतात. या बलाला मध्येच जिरवले तर तोफेवरील बल कमी होते. यासाठी दंडगोल आकाराच्या बंद जागेत हवा व चिकट तेल घालून दट्ट्याची यंत्रणा तयार करून प्रतिक्रियाबल जिरवतात. या यंत्रणेला Recoil Mechanism म्हणतात.

अद्ययावत व अत्याधुनिक विविध यंत्रणांची जोड दिल्यामुळे ATAGS ही तोफ जागतिक दर्जाची झाली आहे. यातील अद्ययावत तंत्रज्ञानाधारित विविध प्रणालींमुळे भारत तोफ या विभागत स्वयंपूर्ण होत आहे.

बोफोर्स FH -77 ची जागा भरून काढून भारतीय तोफखाने समृद्ध, सशक्त व बळकट करण्यासाठी तोफा निश्चितच उपयोगी सिद्ध होत आहेत. म्हणूनच रक्षामंत्रालयाने १५० तोफा बनविण्यासाठीचा आदेश देऊन दोन खाजगी कंपन्यांशी ३३६४.७८ कोटी रुपयांचा करार ऑगस्ट २०१८ मध्येच केला आहे.

ARDE ने 'पिनाक' व ATAGSया दोन्ही तोफखान्यांच्या पूर्ततेसाठी अद्ययावत व अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित केले व आत्मनिर्भर भारत अंतर्गत त्याचे उत्पादन सुरू करून पिनाक अग्निबाण व तोफा भारतीय सेवेमध्ये दाखल होतील आणि भारताच्या सीमा सुरक्षेमध्ये आपले योगदान देतील. या आधी 105IFG व LFG विकसित करण्याचा अनुभव होता. परंतु मधल्या चाळीस वर्षांच्या कालावधीत एकही तोफ देऊ न शकल्याची बोचणी राहील. मात्र इथून पुढे संशोधनात खंड न पडता उत्तरोत्तर नवनवीन शस्त्रे ARDE या पुढेही देऊन भारत अजिंक्य होईल यासाठी आपले योगदान अखंडपणे देत राहील हा विश्वास आहे. जयहिंद!

***

**वटपौर्णिमेनिमित्त**

# ''आधुनिक युगातील सावित्री''

**सौ. मधुरा कर्वे (भावगंधा)**, पुणे

''स्त्री तुझ्या कर्तृत्वाचं
किती मी गाऊन गोडवे
हर मनास वाटे
नमन तुला करावे''

एकविसाव्या शतकात प्रत्येक स्त्रिने अनेक क्षेत्रांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. आत्ताची स्त्री ही 'आधुनिक स्त्री' आहे. भारतात पूर्वीपासूनच 'सत्यवान-सवित्री'ची गोष्ट प्रचलित आहे. आत्ताच्या एकविसाव्या शतकात सत्यवानाला वाचवणारी सावित्री ही दिसतेच. ती आधुनिकतेने नटलेली दिसते. चूलमूल यापासून स्त्री बाहेर पडून शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभी राहिलेली दिसते. घरातील कर्ती स्त्री झालेली दिसते. आपल्या बरोबरच घरातील, तसेच शेजार-पाजारील लोकांना तिने लिहिते, बोलते केलेले आहे. तिने स्वतःचे अस्तित्व टिकवताना स्वतःसाठी संघर्ष करावा लागला तरी उभी राहिलेली दिसते. समाजातील पुरुषांबरोबर ती मानाने गणली जाऊ लागली. सर्व क्षेत्रात ती भरारी मारू लागली. पण जगताना काही वेळेला तिला कुटुंबात तडजोडी कराव्या लागल्या. एकमेकांची मने राखावी लागली. कुटुंबांना सगळ्यांना एक हाती सांभाळून घ्यावे लागले. कधीकधी स्वतःचे अस्तित्व बाजूला ठेवून इतरांचा विचार करावा लागला. कुटुंबातील नात्यांची घट्ट वीण करण्यासाठी कधीतरी ही स्त्री आधुनिक सावित्री होताना दिसली, हळवी होताना दिसली. सर्व जबाबदाऱ्या पार पाडत यांच्यातील दुवा साधण्याचा प्रयत्न करताना अशी दिसते. अशी ही स्त्री सर्व नात्यांमध्ये साथ देते .



हे सर्व करताना तिच्यातील सावित्री पण विसरली नाही. जर आपला सहचर चुकत असेल तर त्याची चूक लक्षात आणून त्याच्या सोबतीला उभी राहिली. चर्चेत, सर्व क्षेत्रात सुद्धा भाग घेऊ लागली. वडाचे झाडाचे पूजन करतांना निसर्ग देखील जपू लागली. पूर्वी याच झाडाखाली ऋषिमुनी बसून तप करायचे, याच झाडाच्या सावलीखाली शांत वाटायचे. अशा या वडाच्या झाडाच्या पारंब्यांखाली जमिनीत रुतून, पक्के रुजून पुनः मोठे कुटुंब तयार करतात आणि सावली अजूनच वाढवतात, पूर्ण मूळं वृक्षाला आधार देतात . त्याचप्रमाणे आताच्या युगातील सावित्रीही सत्यवानाबरोबरच उभी राहिलेली दिसते. कारण सध्याच्या अस्थिरतेच्या काळात आधी कोण जाईल? हे सांगता येत नाही. आताच्या आधुनिक सावित्रीला त्याच्या बरोबरच जगायला आवडते. त्याची काळजी घ्यायला आवडते. त्याची साथीदार म्हणून उभं राहायला आवडते तसेच तो चुकला तर त्याला मार्ग दाखवून त्याची

पान नं. २८ वर

# चातुर्मासातील नेमधर्म

- **सौ. पूर्वा देवधर**, गिरगांव, मुंबई

आषाढ शुद्ध दशमी (या वर्षी ९ जुलै) पासून चातुर्मासाला सुरुवात होते.

चातुर्मासात काहीतरी नेमधर्म करण्याची प्रथा होती. अजूनही काही ठिकाणी चालू आहे. मी लहानपणापासून अशाच काही नेम धर्माबाबत ऐकलं आहे. उदा. चातुर्मासात जवळच्या देवळात जाऊन रोज दिवा लावणे, रोज एक फळ देवासमोर ठेवणे, रोज एखादा पदार्थ ऐपतीनुसार पण स्वखर्चाने सोवळ्यात तयार करून देवळात नैवेद्यास देणे, देवळात रांगोळी काढणे, कीर्तन झाल्यावर प्रसाद वाटणे, प्रसादाच्या पदार्थांची जबाबदारी घेणे, चातुर्मासात प्रत्येक सोमवारी महादेवाला एक लाख बेलाची पाने वाहाणे, मंगळवारी गणपतीला दूर्वांची लाखोली वाहणे, प्रत्येक अष्टमीला कृष्णाला लक्ष तुळशीची पाने वाहणे, एकादशीला विठ्ठलाच्या देवळात तुळशीची लाखोली वाहणे, रोज संध्याकाळी तुपाचा दिवा लावणे, शुक्रवारी, मंगळवारी, सुवासिनींना दान करणे, रोज दारात हळदीकुंकवांच्या पावलांची रांगोळी काढणे. या नेमाच्या उद्यापनाला गरीब सुवासिनीस लाल- पिवळ्या रंगाची कापडं,खण, लुगडं, ऐपतीनुसार देणे वगैरे

## उपास

उपासाचेही खूप प्रकार म्हणजे वारा प्रमाणे उपवास, अवचित मंगळवार करणे म्हणजे दर मंगळवारी जवळच्या किंवा नात्यात आधी न सांगता, अचानक जेवायला जाणे, अळणी मंगळवार, अळणी बुधवार म्हणजे सबंध दिवसभर उपास करायचा रात्री सोडायचा पण अजिबात मिठाचा वापर आपल्या आहारात करू नये. नक्त म्हणजे रात्री जेवू नये, एक भुक्त म्हणजे एक वेळ भुकेले राहणे, धान्यफराळ म्हणजे कोरडं खाणे, लाह्या, चणे, चिवडा, किंवा पाण्याचा वापर करायचा असेल तर पोहे आधी भाजून घ्यावे मग भिजवावे आणि बटाटा पोहे करावे

कांदा लसूण चातुर्मासात शक्यतो खात नसत. का? तर बाहेर पाऊस पडत असल्याने घरात बसून जप, नामस्मरण,भजन, कीर्तन यात मन रमवणे किंवा वेळ घालवणे. अशा धार्मिक कार्यक्रमांत कांदा लसणीच्या वासाने सात्त्विकता कमी होते.

चातुर्मासात उपासही जास्तीत जास्त करण्याची प्रथा आहे. कारण, नदी, विहिरी तलावात पावसाचं नवीन पाणी आलेलं असतं. ते पचण्यास जड असतं. म्हणून एकूणच कमी खावं, प्यावं म्हणजे उत्तम पचन होऊन पोटाच्या तक्रारी राहत नाहीत.

आणखीन काही नेम पाळण्याची प्रथा पूर्वापार आहे. जसे शनिवारी, सोमवारी एका बटूस न्हाऊमाखू घालणे. बाळभुकेचा नेम म्हणजे म्हणजे एखाद्या गरीब छोट्या बाळाला (एक ते दीड वर्षाच्या) रोजचा आहार पुरवणे. दूध, फळं मूगडाळ ,खिचडी, खीर वगैरे.

बरं या व्रताची उद्यापनं ऐपतीनुसार किंवा साधी असतात. म्हणजे बाळभुकेच्या उद्यापनात श्रीमंतांकडून बाळाला चांदीची वाटी मिळत असे.

गरिबांकडून स्टीलची वाटी किंवा फक्त झबले टोपडे मिळत असे. ''ही बघ गं माझ्या मुलाची बाळभुकेची चांदीची वाटी'' असं कौतुकाने दाखविणाऱ्या आज्याही मी पाहिलेल्या आहेत. तोवर ते बाळ मोठं होऊन अमेरिकेत स्थायिक झालेले असे.

सुवासिनींनाही साडी चोळी किंवा साधे खण मिळत. ऐपतीनुसार जसं जमेल तसं पण गरीब-श्रीमंत कोणीही नेम केल्याशिवाय राहत नसे हे महत्त्वाचं. असे अनेक प्रकारचे नेम होते, आहेत. स्त्रिया अर्थार्जनाला घराबाहेर पडू लागल्या म्हणून यांचं प्रमाण खूप कमी झालं पण थांबलं नक्की नाही.

साधारण चार पाच वर्षांपूर्वीची गोष्ट, आमच्या नात्यातील एक ६०- ६२ वर्षांच्या ताई नेहमी नेम करतात. त्यांनी त्यांच्या सूनेसाठी ही एक प्रेमळ सूचना केली. ''बाई गं, नेमाशिवाय राहू नये. तू ऑफिसमधून संध्याकाळी कितीही उशिरा आलीस तरी एक तुपाचे निरांजन देवाजवळ लावायला विसरू नकोस. मी तयारही करून ठेवेन. पण तू फक्त हातपाय धुऊन निरांजन प्रज्वलित करायचं. ५-७ मिनिटं रोज लागतील. पण एक नेम पूर्ण केल्याचं समाधान आणि ठरवून, सातत्याने आपण एखादी गोष्ट नीट पार पाडू शकतो हा आत्मविश्वासही वाढेल बघ.'' आता एवढं सक्रिय सहकार्य आणि आस असेल तर कुठली सून नाही म्हणेल?

नवी पिढी संस्कृती विसरत चालली आहे असं त्यांच्या नावाने शंख करीत बोटं मोडत, टोमणे मारण्यापेक्षा, स्वतः सक्रिय सहभागाने आपण त्यांना किती वेळा प्रवृत्त केलं? हे प्रत्येकाने स्वतःला विचारून, समजून घ्यावं.

मातापित्यांचे, आजीआजोबांचे पाय धूणे, पाय चेपणे इ. नेम छोट्यांना मुद्दाम करायला सांगत असत. भले तो पूर्ण झाला नाही तरी चालेल पण त्याने आपसातील माया वाढीस लागते, आदरभाव दुणावतो. मोठ्यांचा मान राखला जातो. छोट्यांचंही कौतुक होतं

नवविवाहित तरुणींनी पहिली पाच वर्षे चातुर्मासात रोज ३३ गोपद्म काढून त्यांची पूजा करणे, श्रावणी सोमवारी, शंकराच्या देवळात जाऊन शिवामूठ वाहणे, श्रावणी मंगळवारी मंगळागौरीची पूजा करणे इ. नेम असत.

पुढे मुलींच्या लग्नाचं वय वाढलं, शिक्षण नोकऱ्या, यामुळे त्यांना वेळ अपुरा पडू लागला तरीही दोन-तीन टक्के मुलींमध्ये हे नेम चालू आहेत. सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना हे धार्मिक नेमसुद्धा त्या सांभाळतात यात त्यांचं खरंच खूप कौतुक आहे.

मुळात हे नेमधर्म पुढच्या पिढ्यांना करायला सांगण्यामागे याचा उद्देश काय असेल? तर फुले ओळखणे, पत्री गोळा करणे, या निमित्ताने सगळ्या झाडांची रोपांची त्यांना माहिती होते. आजीच्या बटव्यात भर पडत असे व प्रथमोपचारिक जडीबुटीची जुजबी माहिती ही सहज मिळत असे. झाडांचे फुला-पानांचे स्पर्श करूनही फरक ओळखता येत असत.

मंगळागौरीच्या हरताळकेच्या पूजेची तयारी करताना ही किती व्यविधानं सांभाळावी लागतात ते त्या काळातील परकरी पोरीही उत्तम निभावत असत.

पर्यावरणाच्या सानिध्यात गेल्याने

आरोग्य सुधारते. पर्यावरणीय प्रेम वाढीस लागून झाडांची काळजी घेतली पाहिजे, नवीन झाडं लावली पाहिजेत हे वेगळं सांगावं लागत नसे.

मैत्रिणींच्या सहवासात नव्या सूना मोकळ्या वागतात. त्यांचं मन आनंदित होतं, शांत होतं हाच उद्देश आहे. तेव्हा शाळा, कॉलेज, नोकरी हा व्याप घरच्या स्त्रियांना नसे. म्हणून नवनवीन नेमधर्माच्या कल्पना त्यांना नित्य सुचत असत. पुरेसा वेळ देता येत असे आणि एकमेकींच्या बरोबर आनंदही वाटता येत असे.

हल्ली धार्मिक नेम करण्याने जी सात्त्विक शिस्त, सातत्य येतं ते थोडं कमी झालंय. पण हल्ली जसं आरोग्याबद्दल अचानक जागरुकत्व निर्माण होऊन तांब्या-पितळेच्या, काशाच्या जुन्या भांड्यांना अचानक एकदम महत्त्व प्राप्त होऊ लागलं आहे.

तसं मानसिक आरोग्याच्या निमित्ताने, ताणतणावरहित सात्त्विक शांतता लाभावी म्हणून चातुर्मासातील नेमधर्माच्या बाबतीतही नवीन किंवा पुनर्जागरुकत्व होईल ही आशा नक्कीच वाटते.

***



---

पान नं. २५ वरून

सल्लागार सुद्धा बनायला तयार असते. अशी ही आधुनिक सावित्री बनून त्याच्यावर प्रेम करायला आवडणारी अशी आताची स्त्री दिसते. वडाच्या झाडाचे फक्त एका दिवसासाठी पूजन न करता मनानेच पूजन करून सर्व बाबतीत पतीला प्रत्यक्ष साथ देणारी, तसेच त्याच्या घरातल्यांना मान देणारी आजची आधुनिक सावित्री दिसतें.

अशी ही आधुनिक सावित्री सोबतीने स्वप्नपूर्ण करणारी, अपयश आले तर खचून न जाता उभी राहणारी, स्वतःच्या मनाला बांध घालून स्वतः सावरणारी तसेच स्वतःच्या सत्यवानाला सावरणारी. ‘लढाई जिंकणारच’ हा आत्मविश्वास असणारी आणि जर साथीदार कमजोर होताना दिसला; तर त्या ठिकाणी स्वतः ला ठेवून माघार न घेता लढायची तयारी असणारी आजची आधुनिक सावित्री दिसतें.

एक म्हणावेसे वाटते -

“दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा”

खरंच आपण सर्व त्याचीच लेकरे आहोत. आपण सगळ्यांनी एकमेकांना सांभाळून घेऊनच पुढे खंबीर पाऊल टाकायचे असते. सत्यवान सावित्री असा भेदभाव न करता आजच्या युगात सगळ्यांनीच एकमेकांना खंबीरपणे साथ देणे हे महत्त्वाचे आहे. तरच आपली लग्नसंस्था आणि संस्कृती ही जपली जाईल, टिकून राहील.

अशी ही आपली आधुनिक स्त्री आहे; जी स्वतःच्या साथीदाराबरोबरच उभी आहे.

***

# केशवराजानी करून घेतलेली सेवा..

**योगिनी देवधर**, दापोली

श्री. निरंजन नीळकंठ दीक्षित यांचं मूळ गाव देवगड येथील पडेल तालुक्यातलं. आताचं वास्तव्य मुंबईत. यांच्या आईंचे वय वर्षे ८६ असून सुद्धा कोणताही आजार नव्हता व डायबेटिस ब्लड प्रेशर असे आताच्या काळातले कोणतेही शत्रू नव्हते. एकही औषधाची गोळीही घ्यायला लागत नव्हती. पण वृद्धापकाळाने गात्रं गळीत होत चालली होती. तब्येत मंदावली होती, फक्त पातळ पेज घेत होत्या. एवढ्या परिस्थितीतही त्या तितक्याच समाधानाने सांगत होत्या की माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत, तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. डॉक्टरांनी सांगितलं होतं की दवाखान्यात आणून त्यांना आणखी त्रास होईल. कारण नसताना उगाच सुया टोचणं म्हणजे उगाच वेदना देण्यासारखं होईल. आणि तो काळही कोरोनाचा होता, त्यामुळे घरीच ठेवणं योग्य ठरलं.



अशा वेळी धार्मिक वृत्ती असणं किती छान आहे बघा. वे. मू. गोपाळ जोशी यांचा आणि दीक्षित काकांचा परिचय खूप जवळचा असल्याने, दीक्षित काकांनी विचारलं की ''आईसाठी काही धार्मिक कार्य करता येईल का?'' गुरुजींनी लगेच विचारलं की, ''तुमचा कुलस्वामी कोण?'' तर दीक्षित काका म्हणाले, ''केशवराज.'' हो ना, मग ''तिथे जाऊन त्याच्या चरणी ऋग्वेद पारायण करेन'' असा आपण एक संकल्प करू. त्यामुळे आईच्या वेदना कमी होण्यास मदत होईल. तो संकल्प असा होता की, निरंजन काकांचा कुलस्वामी म्हणजे आपल्या सगळ्यांचा 'केशवराज'. तिथे जाऊन ऋग्वेद संहिता पारायण तीन दिवसातच पूर्ण करायचं असा संकल्प केला आणि खरंच आजींना खूप त्रास सोसावा लागला नाही. पुढे काही दिवसातच त्यांच्या आईला देवाज्ञा झाली आणि त्यानंतर त्यांनी थोड्याच महिन्यात पारायण करायचं ठरवल.

ऋग्वेद पारायण म्हणजे १०५५२ एवढे मंत्र आहेत. हे सगळे मंत्र वे.मू. गोपाळ जोशी ह्यांचे पाठ आहेत. एवढंच नव्हे तर त्यांनी फक्त एका दिवसात एक पारायण पूर्ण केलेलं आहे. ते घनपाठी असून स्वतः वेदपाठशाळेमध्ये कित्येक मुलांना शिकवतात. एकाग्रता आणि वेदावर असलेली निष्ठा यातच समजून येते. उपाय तर होणारच, नव्हे नव्हे झालाच पाहिजे ह्याचीही खात्री ह्या साधनेमुळेच येते. धन्य ते वे. मू .गोपाळ जोशी. त्यांना खरंच मनापासून नमस्कार!

सेवा म्हटलं की तिच्यात सहजता येते आणि त्या सहजतेत आपण इतके समरस होतो की जणू भावनेचा पूर वाहून जातो. जेव्हा एखादी गोष्ट कधीतरी करूया असं म्हणलेलं असतं आणि ते प्रत्यक्ष जेव्हा करायचं ठरवतो, तेव्हा ठरविणारे आपण कोण? ठरविणारा तर तोच आहे. सगळ्या जगाचा परमेश्वर आपल्याकडून कर्म करून घेतोच. या चर्चेत श्रीरंग देवधर गुरुजी यांच्या असं लक्षात आलं की यापूर्वी ऋग्वेदी व यजुर्वेदी कोणतंही पारायण केशवराजाच्या मंदिरात झालेलं नाही. एवढे आपण केशवराज्याचे भक्त आहोत पण आपल्या कधी

मनात सुद्धा आलं नाही. परंतु देवाला हवं असतं ते तो कोणाच्या तरी माध्यमातून घडवून आणतो हे खरं आहे. पुढे सातत्याने घडावं अशासाठी हा दृष्टांत असावा असं मला वाटतं.

तर, वर उल्लेख झाल्याप्रमाणे निरंजन दीक्षित आणि श्रीरंग देवधर गुरुजी यांचा एकमेकांशी चांगला परिचय होताच. वैदिक पारायण करणारे वेदमूर्ती गोपाळ जोशी गुरुजी हे पुण्याचे होते. त्यांनीही एवढ्या पायऱ्या चढून जाऊन वेदपारायण करण्याचे कबूल केले. वेदमूर्ती गोपाळ गुरुजी व श्रीरंग गुरुजी हे दोघे मित्र असल्याकारणाने त्यांची राहण्याची व्यवस्था श्रीरंग देवधर गुरुजी यांच्या घरी केली होती. देवधर गुरुजींना या अशा कार्यक्रमांची खूप आवड. त्यामुळे त्यांनी यजमानांना सांगितलं की तुम्ही काही काळजी करू नका, हा कार्यक्रम छानच होईल. मी बाकीची सर्व व्यवस्था बघतो.

आदल्या दिवसापर्यंत श्रीरंग देवधर आणि यजमान यांचे फोन चालू होते. शेवटी तो दिवस उजाडला. गुरुजी, देवधर यांच्याकडे आदल्या दिवशीच राहायला आले होते. २३ जानेवारी २०२२ पारायणाचा पहिला दिवस होता. वेदमूर्ती गोपाळ गुरुजी व देवधर गुरुजी, शिवाय आणखी एका गुरुजींची व्यवस्था देवधर गुरुजींनी केलेली जेणेकरून पारायण चालू असताना कोणताही प्रसंग आला तर पारायणावरुन ऊठायला लागता कामा नये. त्यांचं नाव, निरंजन मुकादम गुरुजी. सकाळी ७ वाजता केशवराजला जायला बाहेर पडले. केशवराजाला पोहोचल्यावर नाश्ता केला. पारायण आटपायला खूप वेळ लागत होता, कारण तीन दिवसात पारायण करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. दुपारी जेवायला ३ वाजत असतं. कोणतही विघ्न न येता कार्यक्रम छान पद्धतीने पार पडला. तिसऱ्या दिवशी स्वतः यजमान निरंजन दीक्षित काका कार्यक्रमाच्या सांगतेला हजर होते. नैवेद्य पुरणपोळीचा होता. वेदमूर्ती गोपाळ गुरुजीही खूप खुष होते. पुन्हा पारायण करू या अशी इच्छा व्यक्त करून पुण्याच्या परतीच्या प्रवासाला लागले. दीक्षित काकांनाही खूप समाधान मिळालं. देवधर गुरुजींचीही खूप दिवसाची इच्छा होती की केशवराज्यास जाऊन यजुर्वेद संहिता पारायण करायचं. दीक्षित काकांच्या मुळे निदान ऋग्वेदी पारायणाचा योग जुळून आला. केशवराज महाराज की जय, वेदपुरुषाय नमः!

***

## देवधर मंडळ – वाटचाल जाहिराती

आपले त्रैमासिक, 'वाटचाल' सर्व कुलबंधू भगिनींना नित्यनेमाने आपली प्रगतीची वाटचाल कळवित असते. हे त्रैमासिक रंगीत अधिकाधिक, वाचनीय आणि संग्राह्य होत आहे.

आता यात आपल्या उद्योग, व्यवसाय याची माहिती जाहिराती द्वारे देता येईल. यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल. आपण यास भरभरून प्रतिसाद द्यावा ही विनंती.

**✻ जाहिरातीचे दरपत्रक ✻**

१/४ पान रुपये १००/-
१/२ पान रुपये २००/-
पूर्ण पान रुपये ४००/-
यात शुभेच्छा जाहिराती सुद्धा देता येतील.

**www.deodharmandal1968.org**
**या आपल्या वेबसाईटला अवश्य भेट द्या**

# मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक मदतीसंदर्भात

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी मंडळाच्या नियमाप्रमाणे गरजू /हुशार कुल विद्यार्थ्यांना (मुले व मुली) शैक्षणिक मदत देण्यात येईल.

अजूनही सर्वत्र असलेल्या कोरोना संकटामुळे अनेक ठिकाणी कुरियर, पोस्ट ऑफिसेस पूर्ण क्षमतेने सुरू नाहीत. त्यामुळे यंदाही अर्ज करताना दि. १५ ऑगस्ट २०२२ पूर्वी ते कोषाध्यक्ष अकल्पिता चिंतामणी देवधर यांना ई-मेल करावेत. अगदीच शक्य नसल्यासच व्हॉट्स ॲप वर पाठवावे. (व्हॉट्स ॲप वरील मेसेच चुकून उडविले जाण्याची शक्यता असते हे लक्षात घेता, ई-मेल वर पाठविलेलेच चांगले.) अर्ज पाठविल्यावर कृपया त्यांना दूरध्वनीवरून तसे सूचित करावे.

सदर अर्जात

१) विद्यार्थ्याचे नाव

२) गेल्या वर्षीचे गुणपत्रक (झेरॉक्स)

३) शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे/शिक्षण संस्थेचे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट

४) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जात खालील सदरांसह आपली पूर्ण माहिती लिहावी.

* पालकाचे नाव, पत्ता (पिनकोड व टेलिफोन नंबर सह)
* विद्यार्थ्याचे पूर्ण नाव, पत्ता, जन्मदिनांक
* यंदा प्रवेश घेतलेली इयत्ता
* पालकाचे वार्षिक उत्पन्न
* पालकाच्या उत्पन्नाच्या दाखल्याऐवजी दोन स्थानिक प्रतिनिधींच्या किंवा दोन आजीव सभासदांच्या शिफरशी (घरातील अथवा नात्यातील आजीव सभासदांखेरीज)
* बँक खाते क्रमांक
* बँकेचे नाव व शाखेचे नाव
* पालकाची स्वाक्षरी
* दिनांक (अवश्य)

अशा तऱ्हेने परिपूर्ण अर्ज अकल्पिता देवधर यांच्याकडे पाठवावेत.

अपूर्ण अर्जांवर विचार केला जाणार नाही. काही तांत्रिक कारणाने (निकालास उशीर इ.) अर्ज पाठविण्यास उशीर होणार असेल तर आगाऊ कळविणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे सर्व माहिती एकत्रित न आल्यास मदत पाठविणे शक्य होणार नाही.

पत्ता : पूर्वा प्रमोद देवधर (सहकार्यवाह)
११/१२, सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२
मोबाईल : ९८६९९३९०७२
Email. : purdeo.77@gmail.com

***



## शब्दकोड्याची उत्तरे

**आडवे शब्द :–**

१) श्री गणेशा २) मनाचे श्लोक ७) माळ ८) सकाम ९) नस १०) चाकर १२) योजना १५) काव १६) क्षर १८) गीतकार २०)कट २१) कसा २२) मन २४) कासव २६) क्रमवार ३०) याक ३२) जावई ३३) समाचार ३६) बंदी ३८) मी ३९) सत्य ४०) बन

**उभे शब्द :–**

१)श्रीमान योगी २) गळ ३) शासन ४) मम ५) चेटूक ६)कष्ट १०) चावट ११) रक्षक १३) जत १४) नाका १५) काक १७) रसाळ १९) रम २३) नक्र २४) काया २५) सकस २७) मजा २८) बाव २९) रईस ३१) लोचा ३४) मास ३५) रक्षा ३६) बंब ३७) बिम



**मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला उपस्थित कुलबंधु–भगिनी**

## यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात कुलबंधु-भगिनींचे पंचाहत्तरी अथवा विवाह सुवर्णमहोत्सवानिमित्त झालेल्या सत्कारांची क्षणचित्रे
















जीवन गौरव पुरस्कार
स्वीकारताना
श्री. नरेश दीक्षित

वि. शं. देवधर स्मृति
गौरव पुरस्कार
स्वीकारताना
अदिती देवधर






कमलाबाई केशव
देवधर स्मृति गौरव
पुरस्कार
स्वीकारताना
श्री. संदीप देवधर

नलिनी देवधर
गौरव पुरस्कार
स्वीकारताना
सौ. अनुराधा दीक्षित



संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट,
भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.